* एक कुल एक कुटुंब *

# बर्वे (बरवे) कुलवार्ता

।। श्री देव कोळेश्वर ।।




Website : www.barvemandal.org

स्थापना १९९१ वर्ष १९ वे अंक ३ रा दि. १५/८/२०१७ स्वातंत्र्य दिन

( खाजगी वितरण - बर्वे कुटुंबियांकरीता )

।। श्री योगेश्वरी प्रसन्न ।।



* बर्वे मंडळीचे कौटुंबिक मुखपत्र *

सोसायटी अॅक्ट नोंदणी क्रमांक महा/७५९-२००१/ठाणे

पब्लिक ट्रस्ट अॅक्ट नोंदणी क्र. एफ/९८३४-ठाणे

# कुलवार्ता
## ऑगस्ट २०१७

## संपादकीय

अलिकडे पाऊस कसा पडेल हे सांगणे फार कठीण झाले आहे. हवामान खाते हवामानाचा अंदाज जाहीर करते, हवामानशास्त्र प्रगत झाले आहे. तरीपण त्यांचा अंदाज चुकतो. यावर्षी नैऋत्य मोसमी पाऊस अंदमान निकोबार बेटे व केरळला लवकर आला. परंतू पुढे त्याची प्रगती झाली नाही. महाराष्ट्रात उशीराच आला याला कारण माणसाने विविध सुधारणा केल्या, डोंगर पोखरले, जंगले नष्ट केली व मोठमोठाले रस्ते, पूल, इमारती बांधल्या, अतोनात वाहने वाढवून हवा दूषित केली. त्यामुळे निसर्गाचे संतुलन बिघडले आहे. माणूस चंद्रावर गेला, मंगळावर गेला परंतू पंचमहाभूतावर नियंत्रण करू शकत नाही. शेवटी माणसाला दैवावर अवलंबून रहावे लागते

पाकिस्तान आपल्याला फारच त्रास देऊ लागला आहे. काश्मिरमधील परिस्थिती फारच कठीण झाली आहे. काश्मिर बाबतचे ३७० चे कलम रद्द करायला हवे ही गोष्ट जरी खरी असली तरी या सरकारातील काही नेत्यांनी या कलमाबद्दल विविध वक्तव्ये केल्यामुळे काश्मिर प्रश्न सुधारण्याऐवजी अधिकच चिघळला आहे. आपले पंतप्रधान सध्या जगातील देशांशी दौरे करुन मैत्री साधण्याचा प्रयत्न करत आहेत व अतिरेक्यांविरूद्ध उठाव करत आहेत. परंतू आपल्याला खरोखर कोण मदत करणार आहेत ही शंकाच आहे.

आता चीन देखील आपल्या कुरापती काढू लागला आहे. या दोघांना एकावेळी तोंड देणे कठीण आहे. आपले लष्कर उत्कृष्ट आहे. परंतु अजूनही आपले लष्करी बळ वाढवण्याची नितांत गरज आहे. त्यामुळे आर्थिक बळही वाढवावे लागेल. हे नविन सरकारपुढे आव्हान आहे.

दिनांक ९ व १० सप्टेंबर २०१७ रोजी आपले ३९ वे वार्षिक स्नेहसंमेलन सांगली येथे होणार आहे. आपण सर्वांनी मोठ्या संख्येने संमेलनास उपस्थित राहून हे संमेलन यशस्वी करावे ही विनंती.

संपादक

**श्री. उदय बर्वे,** डोंबिवली

**सर्वांना गौरी गणपतीच्या**
**हार्दिक शुभेच्छा !**

# पिता-पुत्रांनी खोदली ३० फूट खोल विहीर

**दैनिक सकाळ,** दि. २५/४/२०१७ रत्नागिरी

चिपळूण - घरालगतच्या १० गुंठे जमिनीत सातत्याने भातपीक आणि त्यानंतर भाजीपाला घेण्यासाठी पाणी कमी पडते म्हणून पिता व दोन पुत्र यांनी ३० फूट खोल विहीरच खोदली. पित्याचे नांव रवींद्र परशुराम बर्वे तर मुलांची नांवे राहुल आणि राजेश अशी आहेत. रवींद्र यांचे वय सध्या ७२ वर्षे आहे. त्यांच्या जागेतून वर्षभरासाठी उत्पन्न घेताना हे तिघेच तिथे कष्ट करीत असतात हे वैशिष्ट्य.

चिपळूण नजीकच्या मिरजोळी येथील राहुल व राजेश या दोघांनी स्वयंरोजगाराचा मार्ग पसंत केला. आपल्या जागेत पिके घेण्यासाठी व घरात पिण्यासाठी तसेच गाई-म्हशी पाळण्यासाठी पुरेसे पाणी नव्हते. त्यामुळे त्यांनी दहा वर्षापूर्वी विहीर खोदली. त्यासाठी या तिघानीच काम केले. १९ फूटांवर पाणी लागले. परंतू त्यानंतर मामला थांबला. विहीर घळून घळून रूंद होत गेली. सर्व बुरूम पडून पडून विहीर भरू लागली. त्यामुळे गेल्यावर्षी त्यांनी विहीर बांधण्याचा निर्णय घेतला. १९ फूटांपासून ३० फूटांपर्यंत ते खोल गेले. सारी माती या तिघानीच काढली. त्यानंतर विहीर बांधली. त्यातील तज्ञांनी मात्र खाली चिरे देणे आणि आवश्यक ती कामे  केली.

विहीर स्वतः खोदण्याचा विचार कसा आला विचारता रविंद्र बर्वे म्हणाले की, पाणी नाही मग विहीर खणून तर पाहू असे म्हणून सुरवात केली. दहा गुंठे जागेत ते तोंडली, कारळी, भोपळा, दुधी याचबरोबर केळी, नारळ व फणस यांचे उत्पन्न घेतात.

यावर्षी उन्हाच्या तडाख्याने कारल्याचे वेल सुकून गेले मात्र उर्वरित भाजी चांगली झाली. भाजीला मिरजोळ्यातील आजूबाजूची घरे हे मोठे गिऱ्हाईक आहेत. दोन मुलांपैकी एक भाजी घेऊन चिळूणात घाऊकने देताता. तिघांनी सहा म्हशी पाळल्या आहेत. शेणखतही मिळते. पेंढा व गवत काढण्यासाठी ते आजूबाजूच्या लोकांची जागा ते भाड्याने घेतात व वरंडी तिघेही स्वतः काढतात. आजूबाजूच्या भागात गुरे कमी झाल्यामुळे गवत काढले जात नाही. मात्र हे स्वतः वरंडी काढून बांधून आणतात. यावर्षी जमिन नांगरण्यासाठी पॉवरटिलरचा उपयोग त्यांनी केला. स्वयं रोजगाराचा एकाच घरातील हा आगळावेगळा फंडा म्हणजे तरूणांपुढे उत्तम अनुकरणीय उदाहरण आहे.

---

# लिंबापासून आंब्यापर्यंत - बहरली बाग

**दैनिक महाराष्ट्र टाईम्स,** दि. ०३/६/२०१७ पुणे.

आम्ही सिंहगड रोडवरील सद्गुरू निवास सोसायटीत १९८३ सालच्या ऑगस्टमध्ये रहायला आलो. मला बागकामाची आणि फुलझाडांची आवड असल्यानं इथं आल्यापासून मी घराच्या आजूबाजूची साफसफाई करून फुलझाडं लावायला सुरवात केली. गृहरचना संस्था असल्याने घराच्या चारही बाजूला फक्त १०-१० फूट जागा झाडांसाठी शिल्लक राहिली. पहिल्या मजल्यावर कुंड्यांमध्येही भरपूर आणि वेगवेगळी झाडं लावली.

सुरवातीला बाराही महिने फुलं मिळतील अशी तगर, ३-४ प्रकारची जास्वंद, गुलाब, कण्हेर इ. झाडे लावली. नंतर ऋतूनुसार मिळतील अशी उन्हाळ्यात वेली, मोगरा, सोनचाफा, तेरडा मग पावसाळ्यात जाई-जुई, हिवाळ्यात कुंदाची फुलं अशी लागवड केली. सुरवातील इथं वस्ती कमी असल्याने दोन कोपऱ्यावर नारळ, आंबा अशी झाडं लावली. मागील बाजूस सोनकेळ्याची (वेलची केळी) रोपं एकदाच लावली; पण ती केळीची झाडं अद्याप आम्हाला वर्षातून दोनदा उत्कृष्ट केळी देतात. एकेका घडात १०-१२ डझन केळी असतात.

मध्यंतरी गच्चीवर नुसत्या मातीत पेरूचं झाडही लावलं. पण त्याला फारच नगण्य पेरू येत. गेल्या पावसाळ्यात ते झाड खाली आणून तसंच जमिनीत लावलं. सध्या त्याला भरपूर पेरू लागले आहेत. यंदा चिकूचही झाड आमच्यावर प्रसन्न झालं त्यानं आम्हाला १०० ते सव्वाशे चिकू दिले. सहा-सात वर्षापूर्वी आम्ही दापोली कृषि विद्यापीठ नर्सरीतून जायफळ, तमालपत्र आणि मिरं यांची कलमं आणली होती. त्यापैकी जायफळाला यंदा प्रथमच पाच-सहा जायफळ लागली आहेत. पॅशन फ्रूट सरबताचा आस्वादही आम्ही अधुनमधून घेतो. आमच्याकडे एक्झोराचे लाल गुच्छ तर ८-१० महिने येत राहतात. तमालपत्राच्या झाडालाही आंब्याप्रमाणे मोहोर येतो. त्याचा सुवास आजूबाजूला दरवळत असतो. आपण गार पाण्यात सुवासासाठी टाकतो, तो वाळाही आमच्याकडे आहे. गेली दोन वर्षे गच्चीवर माठ, चवळई, वांगी, पुदीना इ. पिकं घेतली आहेत.

या सर्व फुलं आणि फळझाडांसाठी आम्ही फक्त सेंद्रिय खत वापरतो. एका कृषी प्रदर्शनातून आम्ही ओल्या कचऱ्याचं खत बनवण्यासाठी दोन कप्पे असलेलं बास्केटही विकत घेतलं. त्यात रोजचा घरातील ओला कचरा आम्ही जिरवतो. त्यात ४-५ दिवसांनी २-३ तांबे पाणी घालतो. नंतर ते पाणी झिरपून बाहेर येण्यासाठी त्याला पाईप लावला आहे. हे पाणी म्हणजे झाडासाठी जिवनसत्वच आहे. सहा महिन्यांनी एकदा शेण, गोमूत्र, हरभरा डाळीचं पीठ आणि गुळ एकत्र करून त्यापासून जीवामृत हे जीवनसत्व म्हणून झाडांना देतो. हे जीवामृत गुबाला चांगलं मानवतं व फूलांनी कुंड्या भरून जातात. पांढरा व पिवळा सोनटक्का, झेंडू, मेफ्लॉवर, तुळस, मोगरा, कडीपत्ता ही नेहमीची झाडं आहेतच. कुंडीत एक आणि जमिनीत एक अशी दोन लिंबाची झाडं असल्यान आम्हाला १२ महिने घरची लिंब मिळतात.

**आभार**

आपल्या मंडळाचे उपाध्यक्ष श्री. नंदकुमार बर्वे, यांनी स्वःताहून आपल्या मंडळासाठी विकत घेतलेल्या २ स्टीलची कपाटे ठेवण्यासाठी आपल्या ठाणे येथील कारखान्यात जागा उपलब्ध करुन दिली. त्याबद्दल बर्वे कुल स्नेह संवर्धक  मंडळ, ठाणे, श्री.नंदकुमार बर्वे, यांचे आभार व्यक्त करीत आहे.

# गुणवंत बर्वे

## श्री. जयेश पद्माकर बर्वे

इंदूरचे श्री. जयेश पद्माकर बर्वे यांचे प्राथमिक शिक्षण बालनिकेतन विद्यालय, इंदूर येथे झाले. उज्जैनच्या गव्हर्मेंट इंजिनिअरींग कॉलेजमध्ये BE मेकॅनिकल इंजिनिअरींगचे शिक्षण पूर्ण केले. प्रथम SGSITS इंदौर येथे प्रॉडक्शन इंजिनिअर म्हणून काम केले. त्याच्यानंतर इंदौरच्या जवळ पिथमपूर येथे फोर्स मोटर्समध्ये जवळ जवळ दोन वर्षे काम केले. त्यानंतर मेडीकेप्स कॉलेज इन्दौर येथे गेली १७ वर्षे मेकॅनिकल डिपार्टमेंटमध्ये असोसिएट प्रोफेसर म्हणून काम करतात. मार्च २०१७ मध्ये बेस्ट टीचर अॅवार्ड मिळाले त्याबद्दल त्यांना प्रशस्तिपत्र व रु. ११,०००/- रोख देण्यात आले. सन २०१५ च्या सुमारास एक बिझनेस व्हेन्चर चालू केले. "इंदौरी नमकीन" या बिझनेसचा उद्देश संपूर्ण भारतात इन्दौरचे नमकीनचा पुरवठा करणे होता. या संबंधीचे फोटो कव्हर पानावर छापण्यात आले आहे. जयेश यांचे वडील पद्माकर बर्वे PWD मध्ये उच्च श्रेणी लिपिकच्या पदावरुन रिटायर्ड झाले. त्यांची आई सौ. अनिता पद्माकर बर्वे शासकीय उच्च माध्यमिक विद्यालयातून २००७ मध्ये रिटायर्ड झाली. त्यांची पत्नी सौ. रुपाली जयेश बर्वे या इंदौर मध्ये पोर्टल (webdunia.com) मध्ये सब एडिटर आहेत. त्यांचा मुलगा ईशान जयेश बर्वे इयत्ता ५वी मध्ये NDPS मध्ये आहे.

---

**चुकीची दुरुस्ती**

दि. २८/४/२०१७ रोजी प्रसिद्ध झालेल्या अंकातील पृ.क्र ६ वर विवाहयोग या सदरात श्री. सुभाष म्हसकर यांचा मोबाईल नं. **09833617696** असा वाचावा. चुकीबद्दल क्षमस्व.

तसेच शेवटच्या पानावर मासिकाचे मागील कव्हरावर कुलवार्ता टपाल व्यवस्था या सदरात श्री. प्रकाश गजानन बर्वे, २०१ मुग्धा सोसायटी, कोथरूड बस स्टॅण्डमागे, कर्वे रोड, पुणे -४११ ०३८ असा वाचावा. ( कृपया लक्षात असूद्या आता श्री. विणु गोविंद बर्वे हे टपाल व्यवस्था बघत नाहीत.)

# युवा आणि उद्योजक संमेलन

**बर्वे सभासद आणि कुटुंबिय :**

बर्वे मंडळातर्फे सन २००७ मध्ये ”उद्योजक बर्वे” अशी एक शाखा स्थापन करण्यात आली. काही संमेलनामध्ये उद्योजक मंडळींची बैठक, मुलाखती आणि चर्चासत्रही आयोजित केले. तसेच उद्योजकनिधी उभारून मंडळातर्फे पांच उद्योजकांना अर्थसहाय्य करण्यात आले. याही वर्षी सांगली संमेलनात उद्योजक आणि युवा संमेलन आयोजित करण्यात आले आहे.

संमेलनाचे फायदे खालीलप्रमाणे–

१) उद्योजकांना आपसातील सहकार्य वाढून त्याचा उपयोग उद्योग वाढीकरिता होतो.

२) ज्यांना आपल्या उद्योग व्यवसायाचा विस्तार करायचा आहे वा पूरक उद्योग चालू करायचा आहे त्या संबंधी माहिती मिळते.

३) युवा मंडळींना उद्योग व्यवसायाकरिता मार्गदर्शन मिळते.

४) मध्यम वयीन मंडळी जी आपल्या नोकरीतील अनुभवाचा उपयोग करुन व्यवसाय करू इच्छितात.

**उद्योजक संमेलनातील विषय :**

१) सद्य:स्थितीत काळानुरुप उद्योगात काय संधी आहे ? नविन उद्योग कुठले ?

२) भांडवल उभारण्याचे वेगवेगळे पर्याय.

३) शेती आणि ग्रामीण भागात उद्योगातील नवीन संधी.

४) उद्योजक त्यांच्या उद्योगाचे आणि अनुभवाचे सादरीकरण करणार आहेत.

**युवा संमेलनातील विषय :**

१) कुठल्याही शाखेच्या विद्यार्थ्यांना नोकरी / व्यवसाय / लघुउद्योगातील आवडीनुसार निवडण्याच्या संधी.

२) स्टार्टअपचे जग आणि त्यातील संधी.

३) पालकांसाठी चाकोरीबद्ध मार्गाचा हट्ट सोडा, तुम्ही पाठीशी उभे राहिलात तर मुले वेगळ्या क्षेत्रात नक्की यशस्वी होतील.

४) विविध क्षेत्रातील अनुभवी बर्वे मंडळी त्या त्या क्षेत्रातील संधी बद्दल माहिती सांगणार आहेत.

सर्व युवा मंडळी, त्यांचे पालक, उद्योजक, व्यावसायिक आणि उद्योजक-व्यावसायिक होऊ इच्छित मंडळी यांना आवाहन करण्यात येत आहे की, त्यांनी सांगली संमेलनात उपस्थित राहून युवा आणि उद्योजक संमेलनात भाग घ्यावा. सांगली संमेलन दि. ९ आणि १० सप्टेंबर रोजी खरे क्लब हाऊस येथे आयोजित करण्यात आले आहे. संमेलनाचा विस्तृत कार्यक्रम अहवालात छापला आहे. अधिक माहिती करिता खालील समिती सदस्यांशी संपर्क साधावा.

**युवा समिती -**

१) संजय रमेश बर्वे, मुंबई- मो.९९३०००५९३५
२) मिलिंद मुरलीधर बर्वे, ठाणे- ८१०८११६६११
३) पराग रामानंद बर्वे, इगतपूरी- ८१४९५२४५५९
४) श्रीहर्ष प्रभाकर बर्वे, बडोदा- ९०९९९०७४०१

**उद्योजक समिती -**

१) मिलिंद मनोहर बर्वे, पुणे- मो.९८२२५०४४५२
२) संदीप प्रभाकर बर्वे, पुणे- ८४११०३१९१९
३) जयेश मधुकर बर्वे, ठाणे- ९०२९००१२९९
४) सतीश जनार्दन बर्वे, जालगांव- ९४२२३८२०४४

**नंदकुमार रामचंद्र बर्वे,** ठाणे.
उपाध्यक्ष आणि निमंत्रक - उद्योजक बर्वे
मो. ९९६७६५२८३१

# गुणवंत विद्यार्थी -

| | | |
|---|---|---|
| १) स्वराली श्रीप्रसाद बर्वे, डोंबिवली | -१२वी वाणिज्य शाखेत | ८२% गुण. |
| २) पूर्ती संदीप बर्वे, मुलुंड | -१०वी परीक्षेत | ९६% गुण. |
| ३) अनिकेत विनय बर्वे, डोंबिवली | - १०वी परीक्षेत | ६९% गुण. |
| ४) श्रीया सुनिल बर्वे, तारापूर | - १२वी वाणिज्य शाखेत | ८७.५४% गुण. |
| ५) विदुल जयेश बर्वे, ठाणे | - १०वी परीक्षेत | ८८.४०% गुण. |
| ६) सुनिधी शिरीष बर्वे, अंधेरी | - बी टेक (आय.टी.) | ७६% गुण. |
| | एस.एन.डी.टी. मुंबई विद्यापिठ, डिझाईनमधील पदव्युत्तर शिक्षण श्रीष्टी इन्सिट्युट ऑफ टेक्नोलॉजी बंगलोर येथे घेणार आहे. | |
| ७) वरूण मकरंद बर्वे, पुणे | - ८वी स्कॉलरशीप | ८५.०३% पुणे जिल्ह्यात २६ वा क्रमांक. |
| ८) सावनी जितेंद्र बर्वे, पुणे | - १२वी वाणिज्य शाखेत | ७४% गुण. |
| ९) अनिरुद्ध नंदकुमार बर्वे, कोरगांव-गोवा, १२वी | | ८४.१% गुण. |
| १०) प्राची गोपाळ बर्वे, परळ | -चार्टर्ड अकौटंट (सनदी लेखापाल)झाली. | |
| ११) शुभम सलील बर्वे, पुणे | - बीई (मेकॅनिकल) मध्ये डिस्टीनक्शन. | |
| १२) निहार मनोहर बर्वे, नाशिक | -बीएससी प्रथम श्रेणीत. | |
| १३) साक्षी अतुल बर्वे, कोठुरे | -१२वी सायन्स | ६५% गुण. |
| १४) अनुजा चंद्रशेखर बर्वे, डुबेरे | -१२वी सायन्स | ७४% गुण. |
| १५) हृषिकेश अनिरुद्ध बर्वे, नाशिक | - १२वी सायन्स | ८३% गुण. |
| १६) नेहा प्रशांत बर्वे, पांडुर्ली | - १०वी | ८२% गुण. |
| १७) दिपीका प्रताप बर्वे, बंगलोर | - १०वी सेंट्रल बोर्ड | ए + ग्रेड. |

सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे मंडळातर्फे हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा !

## नवीन सभासद यादी १ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर २०१६

**आधारस्तंभ**

१२२९ - अजय श्रीकृष्ण बर्वे, इंदौर.
१२३० - अल्पन सलील बर्वे, पुणे.
१२३१ - सलील वासुदेव बर्वे, पुणे.
१२३२ - विवेक के. बर्वे, रायपूर.
१२३३ - श्रृती विवेक बर्वे, रायपूर.
१२३४ - अमेय विवेक बर्वे, रायपूर.
१२३५ - अनघा अमेय बर्वे, रायपूर.
१२३६ - संपदा प्रसन्न बापट - बर्वे, चिपळूण.
१२३७ - आशिष घनश्याम बर्वे, साखळोली.
१२३८ - कांचन समीर चांदोरकर - बर्वे, लांजा
१२३९ - गौरव प्रदीप बर्वे, अंधेरी.
१२४० - प्रमोद पर्शराम बर्वे, जालगांव.
१२४१ - चैतन्य प्रदीप बर्वे, पुणे.
१२४२ - सुधा कमलाकर वेलणकर -बर्वे, विलेपार्ले.
१२४३ - डॉ. विद्या आनंद साठे -बर्वे, पुणे.
१२४४ - अर्चना अनिल बर्वे - इंदौर.

## नवीन सभासद यादी १ जानेवारी ते ३१ मार्च २०१७

**आधारस्तंभ**

१२४५ - स्वाती सुहास फडके - बर्वे, पुणे.
१२४६ - अंजली संजय बर्वे, पुणे.
१२४७ - अनघा अनिरुद्ध बर्वे, पुणे.
१२४८ - मानस्वी अनिरुद्ध बर्वे, पुणे.

## नवीन सभासद यादी १ एप्रिल ते ३० जून २०१७

**आधारस्तंभ**

१२४९ - नितीन विष्णु बर्वे, पुणे.
१२५० - अनुसया नितीन बर्वे, पुणे.
१२५१ - माधुरी जयेश बर्वे, ठाणे.
१२५२ - डॉ. महेश अच्युत बर्वे, फलटण.
१२५३ - डॉ. प्राची महेश बर्वे, फलटण.
१२५४ - पूर्वा महेश बर्वे, फलटण.
१२५५ - अथर्व महेश बर्वे, फलटण
१२५६ - अनिरूद्ध अविनाश बर्वे, विटा.
१२५७ - मीना माधव बर्वे, पुणे.
१२५८ - डॉ. प्राजक्ता सलील मोडक -बर्वे, पुणे.

## १ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर २०१६ कालावधीत जमा झालेल्या देणग्या

**शिक्षण निधी**

(१) योगिता चितळे - बर्वे, विलेपार्ले रु. ५,०००/-
(२) सविता श्रीपाद ओक-बर्वे, नाशिक रु. १,०००/-
(३) नारायण अच्युत बर्वे, मुलुंड रु. १,०००/-
(४) उषा केशव मनोहर -बर्वे, तारापूर रु. ७५१/-
(५) हरी मोरेश्वर बर्वे, ठाणे. रु. ५,०००/-

**एकूण रु. १४,७५१/-**

**आकस्मिक आपत्ती निधी**

(१) अरविंद विष्णु बर्वे, डोंबिवली रु. ३,०००/-

**एकूण रु. ३,०००/-**

**उद्योजक निधी**

(१) नंदकुमार बर्वे, ठाणे रु. ५,०००/-

**एकूण रु. ५,०००/-**

**कुलवार्ता निधी**

(१) अनघा गोखले - बर्वे, ठाणे रु. ५,०००/-
(२) सप्तशती ज्वेलर्स, डोंबिवली रु. १,२००/-

**एकूण रु. ६,२००/-**

## १ जानेवारी ते ३१ मार्च २०१७ कालावधीत जमा झालेल्या देणग्या

**शिक्षण निधी**

(१) धनंजय रामकृष्ण बर्वे, विलेपार्ले रु. १,०००/-

(२) श्रीमती रोहिणी बर्वे, डोंबिवली रु. ५००/-

(३) उषाताई बर्वे, पुणे रु. ५,००१/-

**एकूण रु. ६,५०१/-**

**उद्योजक निधी**

(१) धनंजय रामकृष्ण बर्वे, विलेपार्ले रु. १,०००/-

**एकूण रु. १,०००/-**

## १ एप्रिल ते ३० जून २०१७ कालावधीत जमा झालेल्या देणग्या

**शिक्षण निधी**

(१) पद्माकर दत्तात्रय बर्वे, इंदौर रु. १,०००/-

(२) माधुरी मोरेश्वर फाटक, दापोली रु. १,०००/-

**एकूण रु. २,०००/-**

आपल्या बर्वे कुल स्नेह संवर्धक मंडळाची वेबसाईट Website : www.barvemandal.org सुरु झाली आहे. प्रत्येक बर्वे मंडळींनी ही वेबसाईट आवर्जून बघावी. आपण त्यावरील माहीती वेळोवेळी अद्ययावत (Update) करत असतो. जेणेकरुन आपणा पर्यंत ताजी माहिती पोहचविण्याचा हा एक प्रयत्न. आपला अभिप्राय अवश्य कळवा.



**सर्व बर्वे (बरवे) मंडळींना**

**गणेशोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा!**